प्रेसनोट

दि. २५/०७/२०१९

**पिंपरी येथील कुणाल हॉटेल समोर लघुशंका करणाच्या कारणावरुन हितेश मुलचंदानी या तरुणाचा निर्घुन खून करणा-या स-हाईत गुन्हेगारांना युनिट ४,गुन्हे शाखा,पुणे शहर कडून २४ तासाच्या आत अटक.**

---

दि. २३/०७/२०१९ रोजी रात्रौ ०३.२० वा चे सुमारास या गुन्हयातील आरोपी १. अमिन खान रा खडकी बाजार २. शाहबाज शिराज कुरेशी रा कासारवाडी ३. आरबाज शेख रा खडकी बाजार ४. अक्षय संजय भोसले ऊर्फ लिंगा रा सांगवी ५. लंगडा रा सांगवी,पुणे हे एका टाटा सुमो गाडीमधून पिंपरी येथील कुणाल बार ॲन्ड रेस्टॉरंट या हॉटेलमध्ये बीअर घेण्यासाठी आले असताना, अमिन खान हा हॉटेलचे गेट जवळ लघुशंका करीत असताना त्यास सदर ठिकाणी लघवी करु नको असे म्हणाल्याचे कारणावरुन अमिन खान व त्याचे इतर ४ साथीदारांनी साहिल ललवानी यास शिवीगाळ करुन अमीन खान याने वेटर कैलास पाटील याचे डोक्यात बिअरची बाटली मारुन त्यास जखमी केल्याने आरोपींची पळापळ सुरु झाली. त्याचवेळेस हॉटेल समोरुन फिर्यादीचा चुलत भाऊ व हितेश मुलचंदानी हे हॉटेल समोरुन येत होते. त्यावेळेस अमिन खान यास लखन सुखेजा व हितेश मुलचंदानी यांनी पकडून ठेवले. लखन सुखेजा हा मदतीसाठी हॉटेल कुणाल मध्ये गेला असता, पळून गेलेले आरोपी पुन्हा हितेश मुलचंदानी याचेकडे आले व हितेशला उचलून सुमो गाडीत घालून पळवून नेले असता, यातील काही आरोपींनी अमिन यास फोन लावून वेटरकडे फोन देण्यास सांगून, आमच्या माणासाला सोडून दया अन्यथा तुमच्या माणसाला जिवे ठार मारु अशी धमकी दिली. त्यानंतर पिंपरी पोलीसांनी पिंपरी चिचवड महानगरपालिकेचे मागे एक अज्ञात इसमाची बॉडी सापडली असून, सदरची बॉडी ही तुमच्या माणसाची आहे का? याबाबत विचारणा केली. फिर्यादी यांनी सदरची बॉडी बघीतली असता, सदर बॉडी ही हितेश मुलचंदानी याचीच असल्याचे दिसले. त्यानंतर शासकीय रुग्णालयात दाखल केले असता, त्यास मृत घोषित केल्यावरुन वरील आरोपीविरुध्द पिंपरी पो स्टे येथे ८१७/१९ भादवि क ३०२,३६४,३२६,५०४,१३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

हितेश मुलचंदानी याचा शुल्लक कारणावरुन निर्घुन खून झाल्यानंतर पिंपरी भागात व्यापारी संघटनेने बंद पाळून त्याचा निषेध नोंदविला होता व आरोपींना त्वरीत अटक होवून तात्काळ फाशी व्हावी यासाठी पिंपरी भागात मोच व कॅन्डल मार्च काढण्यात आले होते. सदर घटनेची पुणे शहरात सुध्दा पडसाद उमटू लागले होते. सदरचा विषय अतिशय संवेदनशिल बनत चालला होता व नागरिकांकडून आरोपींच्या अटकेची मागणी होत होती.

वरील प्रकरणाचे गांभिर्य लक्षात घेवून व आरोपी हे खडकी पो स्टे चे रेकॉर्डवरील गुन्हेगार असल्याने मा. अपर पोलीस आयुक्त सो श्री अशोक मोराळे, गुन्हे,पुणे यांनी संबधित गुन्हेगारांचा शोध घेणेबाबत गुन्हे शाखेच्या सर्व शाखांना सुचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार युनिट ४ कडील पोलीस अधिकारी व स्टाफ हे आरोपीचा कसुन शोध घेत असताना **पोलीस कर्मचारी राजू मचे** यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, नमुद गुन्हयातील आरोपी संजय भोसले ऊर्फ लिंगा व योगेश ऊर्फ लंगडा टोम्पे हे महाराष्ट्र रेस्टॉरंट जवळ, औंध रोड,पुणे येथे थांबलेले असल्याची खात्रीशिर

माहिती मिळाल्याने युनिट ४ कडील अधिकारी व कर्मचारी सदर ठिकाणी सापळा रचून वरील आरोपी नामे **१) अक्षय संजय भोसले ऊर्फ लिंगा, वय २५ वर्षे रा. शितोळे नगर, जुनी सांगवी,पुणे २) योगेश ऊर्फ लंगडा विठठल टोम्पे, वय २० वर्षे रा डायनासोर गार्डनचे पाठीमागे, जगताप चाळ, पिंपळे गुरव,पुणे** यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांनी गुन्हयाची कबुली देवून त्यांचेकडे अधिक चौकशी करता,त्यांनी सांगितले की, सदर गुन्हयात वापरलेली टाटा सुमो ही त्यांनी सांगवी परिसरातून चोरली असून, पिंपरी या ठिकाणी एका व्यक्तीस उचलून त्यास सुमो गाडीत घालून त्याचा गाडीतच चाकूने भोकसून त्याचा खून करुन ती सुमो गाडी औंध परिसरात सोडून दिली आहे. सुमो गाडी चोरलेबाबत सांगवी पो स्टे गुरनं ६०९/१९ भादवि क ३७९ असा गुन्हा दाखल आहे.

सदर आरोपींविरुध्द पुणे शहरात विविध पोलीस स्टेशनला गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल असून, युनिट ४ शाखेकडून उर्वरित आरोंपीचा कसुन शोध घेणे सुरु आहे.

सदरची कारवाई ही मा. अपर पोलीस आयुक्त श्री अशोक मोराळे, मा पोलीस उप आयुक्त श्री बच्चन सिंह, सहा पोलीस आयुक्त श्री भानुप्रताप बर्गे, पोलीस निरीक्षक श्री अंजुम बागवान यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक विजय झंजाड, निलेशकुमार महाडिक, पोलीस कर्मचारी राजू मचे, गणेश साळुंखे, हनुमंत बोराटे, सचिन ढवळे, शंकर पाटील,गणेश काळे, राकेश खुनवे, अशोक शेलार, यांनी केली आहे.